सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

दालन क्र. २२५, विस्तार इमारत, मंत्रालय, (विस्तार), मुंबई-४०००३२

क्रमांक:-संकिर्ण-२०२४/प.क्र.१०/नो.शा. दिनांक: १० जुले,२०२४.

प्रति,

कक्ष अधिकारी
(संगणक कक्ष)
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.

विषय- सन २०२४-२५ या वर्षाकरिता रिसोग्राफर मशीन दुरूस्ती व देखभालीसाठी निविदा प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागासाठी सन २०२४-२५ या वर्षाकरिता रिसोग्राफर मशीन दुरूस्ती व देखभालीसाठी विभागाच्या संकेतस्थळावरून निविदा प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

सोबत- वरीलप्रमाणे

(वंदना सनगर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

D:\२०२३\२०२४-सकीर्ण-२०२४-प्र.क्र.१०-नो.शा. रसो ग्राफर मशीन दुरुस्ती व देखभाल दर करार करण्याबाबत सन २०२४-२५.docx

# निविदा सूचना

विषय:- रेसोग्राफर मशीन दुरुस्ती व देखभाल वार्षीक दरकरार करणेबावत.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, २ रा मजला, रु.नं.२२५ (विस्तार) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ या विभागामध्ये कॅनन डिजिटल डुप्लीकेटिंग मशीन (RISO EZ २११A) या कंपनीची रेसोग्राफर मशीन वापरात आहे. सदर रेसोग्राफर मशीनसाठी सन २०२४-२५ या वर्षासाठी वार्षीक देखभाल व दुरुस्ती, तसेच मास्टर रोल, इंक कार्टेज इत्यादीचा पुरवठा करण्यासाठी इच्छूक कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

या वार्षिक दरकराराकरीता खालील अटी व शर्ती लागू राहतील:-

१) संबंधित कंपनीने रेसो मशीन करीता चांगल्या दर्जाच्या साहित्याचा दरकराराच्या दिनांकापासून पुढील एक वर्षासाठी पुरवठा करणे बंधनकारक राहील. असे १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देण्यात यावे.

२) विभागाने मागणी केल्यापासून २४ तासात पुरवठादाराने साहित्य पुरविणे आवश्यक राहील व पुरविण्यात आलेल्या मालाची प्रतवारी व दर्जा हा योग्य नसल्याचे आढळून आल्यास सदरहू करार एकतर्फी संपुष्टात येईल व पुरवठादारास काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

३) निर्धारित केलेल्या एक वर्षाच्या कालावधीत रेसोशी संबंधीत साहित्याच्या दरामध्ये कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे दरवाढ झाली तरी पुरवठादाराने दरपत्रकात सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करुन मिळणार नाही.

४) रेसो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी सोबत अधिकृत पुरवठादार करार केला असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

वरीलपैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास सदरहू करार कोणतीही पूर्व सूचना न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार शासनाकडे राहील. वरील अटी व शर्ती मान्य आसल्यास आपण ही निविदा प्रसिध्द झाल्याच्या दिनांक १०.०७.२०२४ दि.१९.०७.२०२४ या कालावधीपर्यंत वंद पाकिटामध्ये (लिफाफा) आपले दरपत्रक या विभागास सादर करावे.

वंदनासनगर

(वंदना सनगर)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन